ePaper

# माजी खासदार शिवाजीराव आढळराव पाटील यांची शिवसेनेतून हकालपट्टी



| वर्ष - 6 । अंक - 88 | UDYAM-MH-26-0158827 |

# महाईन्यूज ™

लढाई सत्याची... लोकशाहीच्या हक्काची!

## आतील पानांत

- हरिभक्तीच्या खेळात वैष्णव दंगला
- महापालिकेच्या 'सुरक्षारक्षक आणि ग्रीनमार्शल' पथकात तृतीयपंथीयांचा समावेश
- वर्षाविहारासाठी लोणावळ्यात पर्यटकांची प्रचंड गर्दी

www.mahaenews.com | । रविवार । दिनांक 3 जुलै 2022 | पिंपरी-चिंचवड आवृत्ती | mahaenews.com | maha_enews | Mahaenews



"उद्धव ठाकरे यांनी राजीनामा देताना सांगितले, "माझ्याच लोकांनी दगा दिला." चाळीस आमदारांपैकी काहींनी आधी शिवसेनेचा राज्यसभेचा उमेदवार पाडला व याच गटाने भारतीय जनता पक्षाचा पाचवा उमेदवार विधान परिषदेत विजयी केला. दगाबाजीची ही बीजे रोवली जात असताना मुख्यमंत्री याच लोकांवर कुटुंबाचे घटक म्हणून विश्वास ठेवून होते. छत्रपती सांगतात, "शत्रूची फौज कधीच मोजू नका. आपल्यातील फितूर किती ते मोजा!"

**- संजय राऊत, शिवसेना नेते**

"उद्धव ठाकरे यांना बनवाबनवी करण्यात नोबेल पुरस्कार मिळू शकतो. त्यांनी केवळ आरे कारशेडचं काम बंद पाडलं नाही, तर त्यामुळे बाकीची कामं देखील ठप्प झाली. दरम्यानच्या काळात मेट्रोचे डबे बनवणाऱ्या कंपन्यांनी करार रद्द केले. तर कर्ज वितरीत करणाऱ्या संस्थांनी देखील हात आखडता घेतला. पण महाराष्ट्रात आता एकनाथ शिंदे आणि फडणवीस सरकार आलं आहे. त्यामुळे मेट्रोच्या कामांना गती मिळणार आहे,"

**-किरिट सोमय्या, भाजप नेते**



## शॉर्ट न्यूज »

### निगडीत दोन हॉटेलवर पोलिसांचा छापा

पिंपरी । पिंपरी चिंचवड शहरातील निगडी येथे दोन हॉटेलवर पोलिसांनी छापेमारी करत देहविक्री व्यवसाय करवून घेणाऱ्या ३ जणांना पोलिसांनी अटक केली आहे. या कारवाईत ५ तरुणींची सुटका करण्यात अली आहे.

या प्रकरणी पोलिसांकडून तीन जणांना ताब्यात घेण्यात आले असून एकाची शोध सुरू आहे. दीपेन दिनेश शेट्टी, विवेक नोबराज विश्वकर्मा आणि प्रदीप माधवा पुजारी, असे अटक केलेल्या आरोपींची नवे आहेत. आणखी एक आरोपी शशांक शेट्टीचा पोलीस शोध घेत आहे .निगडी परिसरात अवैधरित्या देहविक्री व्यवसाय सुरू असल्याची माहिती पोलिसांना मिळाली होती.

### शरद पवार यांची पुण्यात पत्रकार परिषद...

# बंडखोर आमदारांच्या मतपरिवर्तनाची शक्यता!

## राष्ट्रवादी काँग्रेस पक्षाचे अध्यक्ष शरद पवार यांचे सूतोवाच

**। पिंपरी-चिंचवड । महाईन्यूज ।**



विधानसभेत अविश्वास प्रस्ताव मांडताना गटनेत्याचा पक्षादेश (व्हीप) महत्त्वाचा ठरण्याची शक्यता आहे. या वेळी महाविकास आघाडी म्हणून आम्ही एकत्र राहणार असून, बंडखोर आमदारांचे मतपरिवर्तन होण्याची शक्यता आहे, असे राष्ट्रवादी काँग्रेस पक्षाचे अध्यक्ष शरद पवार यांनी शनिवारी सांगितले. पुण्यात आयोजित पत्रकार परिषदेत पवार बोलत होते. ते म्हणाले, 'विधानसभेच्या अध्यक्षपदी अजूनही नरहरी झिरवळ आहेत. कायद्याने त्यांना अधिकार असल्याने, त्यांची भूमिका महत्त्वाची असेल. महाविकास आघाडी म्हणून घटक पक्षांची आम्ही बैठक घेऊन, एकत्रित अविश्वास प्रस्तावाला सामोरे जाणार आहोत. पक्ष म्हणून विधानसभेतील व्हिप आणि संघटनात्मक काम या दोन्ही वेगळ्या बाबी आहेत. त्यामुळे गटनेत्याने दिलेला व्हीप आमदारांना पाळावाच लागणार आहे. प्रस्तावाच्या वेळी अध्यक्षांची भूमिका महत्त्वाची ठरणार आहे.

### राज्यपालांनी कोणाला पेढा भरवताना पाहिले नाही

विधिमंडळ सभागृहात १९६७ ते १९९० या कालावधीत मी होतो. अनेक वेळा मंत्रिपदाची शपथ घेतली. या कालावधीत राज्यपालांनी कोणाला पुष्पगुच्छ किंवा पेढा भरवताना पाहिले नाही. महाविकास आघाडीच्या मंत्रिमंडळ शपथविधीच्यावेळी एका आमदाराकडून शपथविधीची सुरुवात इतर नावाने केल्याने कोश्यारी यांनी हटकले होते. त्या वेळी कोश्यारी यांनी माझा दाखला दिला होता. मात्र, एकनाथ शिंदे यांनी मुख्यमंत्रिपदाची शपथ घेतांना बाळासाहेब ठाकरे, आनंद दिघे यांची नावे घेत सुरुवात केली. त्यांना कोणीही हटकले नाहीच, याउलट कोश्यारी यांनी पुष्पगुच्छ देऊन अभिनंदन केले, अशा शब्दांत पवार यांनी राज्यपाल कोश्यारी यांना खोचक टोला लगावला. राज्य कुस्तीगीर संघटनेचा मी अध्यक्ष असलो तरी खेळ स्पर्धा आयोजित करणे, खेळाडूंना मदत करणे, त्यांना चांगल्या सुविधा, प्रशिक्षण मिळवून देणे यासाठी साहाय्य केले. राहुल अवारे, अभिजित कटके, उत्कर्ष काळे आदी खेळाडू यांचे खेळ आणखी चांगले होण्यासाठी त्यांना मदत केली.

# पीएमपी धावली बायोसीएनजीवर, निगडी ते लोणावळा मार्गावर सुरुवात

## लवकर आणखी सात बस धावणार, गॅस एमएनजीएलपेक्षा 10 पैशांनी स्वस्त मिळणार

**। पिंपरी-चिंचवड । महाईन्यूज ।**



पीएमपीच्या सीएनजीवरील बस ओल्या कचऱ्यापासून तयार केलेल्या 'बायोसीएनजी'वर (सीबीजी) धावण्यास शुक्रवारपासून सुरुवात झाली. पहिल्या टप्प्यात निगडी ते लोणावळा मार्गावर बायोसीएनजीवरील दोन बस धावत असून, लवकर आणखी सात बस धावणार आहेत. या गॅस एमएनजीएलपेक्षा १० पैशांनी स्वस्त मिळणार असल्याने खर्चातही बचत होणार आहे. पीएमपीकडून पर्यावरणपूरक सार्वजनिक वाहतुकीच्या दिशेने पाऊले टाकण्यास सुरुवात केली आहे. याकरिता पीएमपीने ई-बस आणि सीएनजीवरील

> पीएमपीच्या बसमध्ये बायोसीएनजीचा वापर करण्यात येत आहे. पहिल्या टप्प्यात दोन गाड्या निगडी ते लोणावळा मार्गावर सुरू केल्या असून, लवकरच आणखी सात गाड्या दररोज बायोसीएनजीवर धावतील.
>
> **- दत्तात्रय झेंडे,** वाहतूक व्यवस्थापक, पीएमपी सीएनजी बस दृष्टिक्षेपात...

बस खरेदी केल्या आहेत. शुक्रवारी महापालिका आयुक्त विक्रम कुमार यांच्या हस्ते बायोसीएनजीवर चालणाऱ्या दोन बसचे उद्घाटन करण्यात आले. पीएमपीचे अध्यक्ष लक्ष्मीनारायण मिश्रा, अतिरिक्त आयुक्त कुणाल खेमणार, पीएमपीचे वाहतूक नियोजन अधिकारी दत्तात्रय झेंडे, मुख्य अभियंता चंद्रकांत वरपे आदी उपस्थित होते. पीएमपीने डिझेलवरील सर्व बस ताफ्यातून काढून टाकल्या आहेत. यामुळे येथून पुढे बायोसीएनजीवरील बस सुरू करण्याला प्राधान्य दिले जात आहे. शहरात नोबोल एक्स्चेंज

### पीएमपीकडे एकूण 622 सीएनजी बस

- पहिल्या टप्प्यात १५ बस बायोसीएनजीवर धावणार
- बसमधील गॅसटाकीची क्षमता १०० किलो
- गॅसची किंमत ८० रुपये प्रतिकिलो
- एमएनजीएलपेक्षा १० पैशांनी मिळणार स्वस्त

कंपनीने गोळा केलेल्या ओल्या कचऱ्यापासून सोमाटणे फाटा येथे बायोसीएनजी तयार केला जाणार आहे. तो इंडियन ऑइलच्या रिटेल पंपांवरून पीएमपीला दिला जाणार आहे. या ठिकाणी दिवसाला एक हजार किलो बायोसीएनजी तयार केला जात आहे. सध्या निगडी ते लोणावळा मार्गावर धावणाऱ्या पीएमपी बसमध्ये बायोसीएनजी भरला जाणार आहे. पुढील टप्प्यात आणखी सात बस बायोसीएनजीवर सुरू केल्या जातील. त्यानंतर टप्प्याटप्प्याने बसची संख्या वाढविण्यात येणार आहे.

## शॉर्ट न्यूज »

### विमाननगरमध्ये मसाज सेंटरच्या नावाखाली वेश्या



।पुणे। महाईन्यूज ।

विमाननगर भागात एका मसाज सेंटरमध्ये सुरू असलेल्या वेश्या व्यवसायाचा प्रकार गुन्हे शाखेच्या सामाजिक सुरक्षा विभागाने उघडकीस आणला. पोलिसांनी मसाज सेंटरवर छापा टाकून मसाज सेंटरच्या मालकासह नऊ जणांच्या विरोधात गुन्हा दाखल केला तसेच आठ तरुणींना ताब्यात घेण्यात आले. या प्रकरणी मसाज सेंटरमधील व्यवस्थापक हिना अकबरअली सय्यद, ताजुल इस्लाम अब्दुल वाहीद, फारुख अहमद, बदुल अहमद यांना अटक करण्यात आली. मसाज सेंटरचा मालक सुरेश बाबुलाल परदेशी (रा. ८३०, कसबा पेठ), संदीप शरदचंद्र सहस्त्रबुद्धे (रा. श्रीकृष्ण कॉलनी, काळेवाडी), अविनाश खिंवसरा (रा. ८३०, कसबा पेठ), मसाज सेंटरसाठी जागा उपलब्ध करून देणारे मालक अविनाश भाऊसाहेब साकोरे, भाऊसाहेब साकोरे यांच्यासह आणखी एका विरोधात गुन्हा दाखल करण्यात आला आहे.

# भक्तीरसात भाविक चिंब..!



इंदापूर ।महाईन्यूज ।

विठ्ठलाच्या भेटीच्या आतूरतेने पंढरीच्या वाटेवर असलेल्या वारकऱ्यांच्या संगतीने जगद्गुरू संत तुकाराम महाराजांचा पालखी सोहळा शनिवारी इंदापूरमध्ये दोन दिवसांच्या मुक्कामासाठी दाखल झाला. शहरात प्रवेश करताच सोहळ्यातील दुसऱ्या गोल रिंगणाचा सोहळा मोठ्या उत्साहात पार पडला. हरिभक्तीच्या विविध खेळात दंग झालेल्या वैष्णवांमुळे रिंगणात रंग भरला. निमगाव- केतकीतून मार्गस्थ झाल्यानंतर अखंड हरिनामाच्या गजरात ज्ञानोबा- तुकोबाच्या जयघोषात मजल दरमजल करीत हा सोहळा सोनाई उद्योग समूहाच्या प्रांगणात आला. यावेळी सोनाई उद्योग समूहाचे प्रमुख दशरथ माने, विष्णू कुमार माने यांच्या वतीने वारकऱ्यांना सुगंधी दूध व अल्पोपहार देण्यात आला. नंतर गोकुळीच्या ओढ्यात विश्रांती घेऊन पालखी सोहळा, छत्रपती शिवरायांचे आजोबा मालोजीराजे भोसले यांची ऐतिहासिक जहागीर असलेल्या इंदापूर नगरीत दाखल झाला. यावेळी माजी मंत्री हर्षवर्धन पाटील, नगराध्यक्षा अंकिता शहा, प्रदीप गारटकर, मुकुंद शहा, भरत शहा, कैलास कदम आदींनी पालखी सोहळ्याचे परंपरेनुसार जंगी स्वागत केले. हर्षवर्धन पाटील यांनी पालखी रथाचे सारथ्य केले. पालखी मार्गावरील जगद्गुरू संत तुकाराम महाराजांच्या पालखी सोहळ्याचे दुसरे रिंगण पार पाडण्यासाठी वैष्णव बांधव, वैष्णव भगिनी सज्ज झाल्या. पालखी विसावल्यानंतर रिंगण सोहळ्याला सुरुवात झाली. रिंगणामध्ये प्रथम वारकऱ्यांच्या पताका फडकल्या, पताकाधारी वारकरी आपले रिंगण पूर्ण करत असताना एकच लयबद्ध पताकांच्या सळसळीने जणू असंमतही भक्तिरसात न्हाले. पाठोपाठ डोईवरी तुळशी वृंदावन सावरत वैष्णव भगिनींनी अत्यंत उत्साहाने आपले रिंगण पूर्ण केले.

# वर्षाविहारासाठी लोणावळ्यात पर्यटकांची प्रचंड गर्दी!

## वाहतूक कोंडीमुळे पर्यटकांसह स्थानिकांना मनस्ताप

लोणावळा ।महाईन्यूज । प्रतिनिधी।



राज्यातील वेगवेगळ्या भागातील पर्यटकांनी गर्दी करण्यास सुरुवात केली आहे. वर्षाविहारासाठी पुणे-मुंबईसह राज्यातील वेगवेगळ्या भागातील पर्यटकांनी गर्दी करण्यास सुरुवात केली आहे. शनिवारी मोठ्या संख्येने पर्यटक लोणावळा, खंडाळा परिसरात दाखल झाल्याने वाहतूक कोंडी झाली. कोंडीमुळे पर्यटकांसह स्थानिकांना मनस्तापाला सामोरे जावे लागले.

वर्षाविहारासाठी पुणे, मुंबईसह राज्यातील वेगवेगळ्या भागातील पर्यटक लोणावळा, खंडाळा परिसरात येतात. शनिवारी आणि रविवारी पर्यटकांची गर्दी वाढते. सलग सुट्ट्या आल्यानंतर पर्यटकांची गर्दी वाढते. त्यामुळे शहरातील जुन्या मुंबई-पुणे महामार्गासह ठिकठिकाणी कोंडी होते. शनिवारी (२ जुलै) मोठ्या संख्येने पर्यटक दाखल झाल्याने वाहतूक कोंडी झाली. पाच ते दहा मिनिटांचे अंतर कापण्यासाठी अर्धा ते पाऊण तास वेळ लागत होता. मोटारींच्या रांगा लागल्याचे पाहायला मिळाले. गर्दी वाढल्याने व्यवसाय वाढतो, असा स्थानिक दुकानदारांचा अनुभव आहे. मात्र, दुकानासमोर मोटार तसेच दुचाकी लावण्यास जागा उपलब्ध नसल्याने दुकानात खरेदीसाठी फारशी गर्दी नसल्याचे दुकानदारांनी सांगितले.

### कोंडीमागची कारणे –

रखडलेल्या पुलाची कामे, जुन्या मुंबई-पुणे राष्ट्रीय महामार्गाचे रखडलेले रुंदीकरण, अवजड वाहनांच्या शहरातील प्रवेश बंदीची अंमलबजावणी होत नसल्याने लोणावळा परिसरात कोंडी होत आहे. लोणावळा परिसरात रस्त्याच्या दुतर्फा अतिक्रमणे आहेत. अतिक्रमणांमुळे कोंडीत भर पडत आहे. सलग सुट्ट्या आल्यास शहरात ठिकठिकाणी कोंडी होते. स्थानिक नागरिकांना घराबाहेर पडणे अवघड होते, अशा तक्रारी स्थानिकांकडून करण्यात आल्या.

▶▶ वर्षाविहारासाठी पुणे, मुंबईसह राज्यातील वेगवेगळ्या भागातील पर्यटक लोणावळा, खंडाळा परिसरात येतात. शनिवारी आणि रविवारी पर्यटकांची गर्दी वाढते. सलग सुट्ट्या आल्यानंतर पर्यटकांची गर्दी वाढते. त्यामुळे शहरातील जुन्या मुंबई-पुणे महामार्गासह ठिकठिकाणी कोंडी होते. शनिवारी (२ जुलै) मोठ्या संख्येने पर्यटक दाखल झाल्याने वाहतूक कोंडी झाली.

## तृतीयपंथी घटकांना मुख्य प्रवाहात सामावून घेत महापालिका प्रशासनाचे महत्त्वपूर्ण पाऊल

# महापालिकेच्या 'सुरक्षारक्षक आणि ग्रीनमार्शल' पथकात तृतीयपंथीयांचा समावेश!

## पिंपरी-चिंचवड महापालिकेने तृतीयपंथी पुनर्वसन कार्यक्रम घेतला हाती

**। पिंपरी । महाईन्यूज । प्रतिनिधी।**

तृतीयपंथी घटकांना मुख्य प्रवाहात सामावून घेत असताना आव्हानांचा सामना करत त्यांनी धाडसाने टाकलेले पाऊल पथदर्शक चळवळ उभी करण्यासाठी महत्त्वपूर्ण ठरते. सुरक्षारक्षक आणि ग्रीन मार्शल म्हणून सोपवलेली जबाबदारी तृतीयपंथीयांनी यशस्वीपणे निभावल्यास ही चळवळ इतरांसाठी अनुकरणीय ठरेल असा विश्वास महापालिका आयुक्त तथा प्रशासक राजेश पाटील यांनी व्यक्त केला. तृतीयपंथी घटकांना मुख्य प्रवाहात आणण्यासाठी महापालिकेने तृतीयपंथी पुनर्वसन कार्यक्रम हाती घेतला आहे. या अंतर्गत तृतीयपंथीयांना रोजगार उपलब्ध करून देण्यासाठी महापालिका प्रयत्नशील आहे. त्यानुसार तृतीयपंथीयांची कंत्राटी तत्वावर सुरक्षारक्षक आणि ग्रीन मार्शल म्हणून खाजगी संस्थेमार्फत महापालिका सेवेसाठी नेमणूक करण्यात आली आहे. या नेमणुकीचे पत्र आज महापालिका आयुक्त तथा प्रशासक राजेश पाटील यांच्या हस्ते या तृतीयपंथीयांना देण्यात



आले. त्यानिमित्त महापालिकेच्या मुख्य प्रशासकीय भवनात कार्यक्रमाचे आयोजन करण्यात आले होते, त्यावेळी आयुक्त पाटील बोलत होते.

यावेळी अतिरिक्त आयुक्त विकास ढाकणे, जितेंद्र वाघ, आरोग्य वैद्यकीय अधिकारी डॉ.अनिल रॉय, उपआयुक्त रविकिरण घोडके, कार्यकारी अभियंता प्रमोद ओंभासे, मुख्य सुरक्षा अधिकारी मेजर उदय जरांडे, आपत्ती व्यवस्थापन अधिकारी ओमप्रकाश बहिवाल, समाज विकास अधिकारी सुहास बहाद्दरपुरे, जनता संपर्क अधिकारी किरण गायकवाड, प्रभारी आरोग्य निरीक्षक उमेश जाधव, पोलीस उप निरीक्षक बाळासाहेब आढारी, ग्रीन मार्शल आणि सुरक्षारक्षक पथकात नियुक्ती करण्यात आलेले तृतीयपंथी कर्मचारी अनुष्का जाधव, नयना कोटगीर, झोया शिरोळे, तुषार वाडीले, आतिष तुपे, वैशाली मराठे, मिहिका वर्मा , प्रशांत अडकने, रूपा टाकसाळ, साझ प्रसादसिंग, निकिता मुख्यदल, पूजा पवार, संजू काठे, प्रमित पवार, शायना रॉय, सचिन देशपांडे उपस्थित होते. यावेळी उपस्थित तृतीयपंथी कर्मचा-यांसमवेत संवाद साधताना आयुक्त पाटील म्हणाले, मुख्य प्रवाहात येण्यासाठी महापालिकेने देऊ केलेल्या नोकरीचा स्वीकार करून तृतीयपंथीयांनी धाडसी पाऊल उचलले आहे. उपेक्षित समाजाला मुख्य प्रवाहात आणण्यासाठी खूप आव्हाने उभी असतात. तृतीयपंथीयांनी स्वावलंबी जीवन जगण्यासाठी हे आव्हान स्विकारले हेच खूप महत्वाचे आहे. आजचा दिवस सर्वांसाठी संस्मरणीय असून ग्रीन मार्शल आणि सुरक्षारक्षक पथकात नियुक्ती करण्यात आलेल्या तृतीयपंथीयांची यशोगाथा प्रेरणादायी ठरणार आहे. त्यांच्या जीवनात आलेला सकारात्मक बदल आणि केलेली यशस्वी वाटचाल इतरांसाठी अनुकरणीय असणार आहे. ही एक चळवळ निर्माण झाली आहे. पथदर्शक म्हणून आपण या चळवळीमध्ये आपले कर्तव्य बजावणार आहोत याचे भान प्रत्येकाने ठेवले पाहिजे. भविष्यात शासकीय स्थायी आस्थापनेमध्ये देखील संधी मिळण्याची शक्यता आहे. त्यामुळे अनेक अडथळे येतील, ते पार करण्याची हिंमत ठेवा. महापालिकेची यंत्रणा सदैव तुमच्या पाठीशी उभी असेल. आपल्याला हा पथदर्शी उपक्रम यशस्वी करायचा आहे. भविष्यात या उपक्रमामुळे खूप सकारात्मक गोष्टी घडण्यास चालना मिळणार आहे. हा मोठा निर्णय असून ही महत्वाची चळवळ देखील आहे. लोकांनी तुमच्याबद्दल लिहिले, बोलले पाहिजे असे चांगले काम करून महापालिकेचा विश्वास सार्थ ठरवावा.

### महापालिकेच्या कायम ऋणात राहू

ग्रीन मार्शल पथकात नियुक्ती झालेल्या प्रेम लोटलीकर यांनी ट्रान्समेनच्या व्यथा आणि अडचणी यावेळी विशद केल्या. ते म्हणाले, ट्रान्समेनचे प्रमाणपत्र सहजतेने मिळत नाही. अनेक आस्थापना नोकरी देखील देत नाहीत. भिकही मागता येत नाही. अशी परिस्थिती आहे. त्यामुळे अनेक अडचणींना सामोरे जावे लागते. अशा परिस्थितीत महापालिकेने आमच्या व्यथा समजून घेऊन महापालिकेच्या ग्रीन मार्शल पथकात काम करण्याची आम्हाला संधी दिली. महापालिकेने दिलेला हा सन्मानाचा हात आम्ही कधीही विसरू शकत नाही. सुरक्षारक्षक रूपा टाकसाळ म्हणाल्या, आम्ही घर सोडल्या नंतर आमच्या वाट्याला चांगले जगणे येणार नाही असे वाटले होते, आयुष्यभर अपमान सहन करावा लागणार याच भावनेतून आम्ही आयुष्य जगत होतो. सन्मानाचे जीवन हे आमच्यासाठी स्वप्न होते. हे स्वप्न महापालिकेने प्रत्यक्षात साकार केले असून या सन्मानाबद्दल आम्ही ऋणी आहोत.

आपल्या कामातून समाजामध्ये वेगळी ओळख निर्माण होणार असून आपण समाजासमोर नवीन आदर्श निर्माण करा, असे आयुक्त पाटील यावेळी म्हणाले. नवनियुक्त तृतीयपंथी कर्मचा-यांना पुढील यशस्वी कारकिर्दीसाठी आयुक्त पाटील यांनी शुभेच्छाही दिल्या. तृतीयपंथीयांना महापालिकेचे सुरक्षारक्षक आणि ग्रीन मार्शल पथकात काम करण्याची संधी मिळालेल्या तृतीयपंथी कर्मचा-यांनी भावूक होत आपले मनोगत व्यक्त केले. नवनियुक्त सुरक्षारक्षक निकिता मुख्यदल म्हणाल्या, अपमान आणि अवहेलनेचे जीवन जगण्यापेक्षा स्वाभिमानी जीवन जगावे असे आम्हाला सतत वाटत होते. आम्हाला समाजाने नाकारले पण महापालिकेने आधार दिला, आमच्यावर विश्वास ठेवला.

# 'ईडी – सीबीआय'चा राजकीय वापर बंद करा'

## पिंपरीत आम आदमी पार्टीच्या वतीने भाजप विरोधात जोरदार निदर्शने

**। पिंपरी । महाईन्यूज । प्रतिनिधी।**

आम आदमी पार्टी पिंपरी चिंचवड शहरच्या वतीने आज (दि.०२) डीलक्स चौक, पिंपरी येथे भाजप सरकारच्या अघोषित आणीबाणी विरोधात निदर्शने आंदोलन करण्यात आले. महाराष्ट्रातील सत्तेच्या सारीपाटावरती गेल्या दहा-बारा दिवसापासून ज्या घडामोडी घडत आहेत त्यांचा मास्टरमाईंड भाजपाच आहे. आणि सत्ता संघर्षाची ही राजकीय सर्कस ईडी, सीबीआय सारख्या संविधानिक संघटनांचा दुरुपयोग करून घडवून आणल्या हे आपल्या सर्वांसमोर स्पष्ट झाले आहे.

हे सर्व प्रस्थापित पक्ष चोर चोर मोसेरे भाई या उक्तीप्रमाणे




भ्रष्टाचारात बरबटलेले आहेतच. त्यात सूडबुद्धीने कारवाया करून किंवा पैशाने खरेदी करून सत्तेची गणिते जुळवण्याचे गलिच्छ राजकारण भाजपा संपूर्ण देशामध्ये करत आहे.

ईडीच्या कारवाया फक्त विरोधकांना नामोहरम करण्यात आणि भाजपात सामील अथवा समर्थन मिळाले कि क्लीन चिट देण्यासाठीच वापरत आहे. ही स्थिती भारतीय लोकशाहीसाठी घातक आहे. आज देशामध्ये भाजपच्या या गलिच्छ राजकारणाविरोधात फक्त आम आदमी पार्टीच सक्षमपणे लढा देत आहे.


आपच्या मुख्यमंत्री, मंत्री आणि आमदारांना दिल्लीमध्ये भाजपने केंद्रीय यंत्रणेच्या माध्यमातून त्रास दिला. परंतु आम आदमी पार्टी या सर्वांना पुरून उरली आहे.भारतीय

महाराष्ट्रातील सत्तेच्या सारीपाटावरती गेल्या दहा-बारा दिवसापासून ज्या घडामोडी घडत आहेत त्यांचा मास्टरमाईंड भाजपाच आहे. आणि सत्ता संघर्षाची ही राजकीय सर्कस ईडी, सीबीआय सारख्या संविधानिक संघटनांचा दुरुपयोग करून घडवून आणल्या हे आपल्या सर्वांसमोर स्पष्ट झाले आहे.

लोकशाही वाचवण्यासाठी आता सामान्य जनतेलाच या लढ्यात उतरावे लागणार असल्याचे प्रतिपादन आपचे कार्यकारी अध्यक्ष चेतन बेंद्रे यांनी केले. स्वप्निल जेवळे व यल्लाप्पा वालदोर यांनी या आंदोलनाचे संयोजन केले.

या आंदोलनाला आम आदमी पार्टीचे पिंपरी चिंचवड कार्यकारी अध्यक्ष चेतन बेंद्रे, प्रचार प्रमुख राज चाकणे, पिंपरी विधानसभा कार्याध्यक्ष ब्रह्मानंद जाधव, चिंचवड विधानसभा कार्याध्यक्ष यशवंत कांबळे, भोसरी विधानसभा कार्याध्यक्ष मंगेश आंबेकर, शहर संपर्कप्रमुख गोविंद माळी, शहर आयटी प्रमुख आशुतोष शेळके, असंघटित कामगार प्रमुख शुभम यादव, शहर वाहतूक प्रमुख सुखदेव कारले, शहर सामाजिक न्याय आघाडी प्रमुख चंद्रमणी जावळे, चिंचवड विधानसभा संपर्कप्रमुख संजय मोरे, संतोषी नायर, शशिकांत कांबळे, नितीन कापसे, नंदू नारंग, अजय सिंग, महेश गायकवाड, मीनाताई जावळे, सरफराज मुल्ला, विजय कांबळे, गणेश करडे, सोमनाथ बनसोडे आदी कार्यकर्ते उपस्थित होते.

### गुटखा विक्रीप्रकरणी शहरात 4 ठिकाणी कारवाई;



**पिंपरी ।** अवैध गुटखा विक्री प्रकरणी पोलिसांनी चाकण, चिखली आणि वाकड येथे ४ ठिकाणी कारवाई केली. याप्रकरणी गुरुवारी (दि.३०) संबंधित पोलिस ठाण्यात गुन्हे दाखल करण्यात आले आहेत.

पहिली कारवाई महाळुंगे पोलिसांनी खराबवाडी येथे केली. संदीप बुधाजी बुरांडे (३५, रा, निघोजे, ता. खेड) याला अटक करण्यात आली आहे. त्याच्याकडून ६५ हजार १९७ रुपयांचा तंबाखूजन्य गुटखा जप्त केला आहे. दुसरी कारवाई गुन्हे शाखा युनिट तीनने आंबेठाण चौक चाकण येथे केली. या कारवाईमध्ये पोलिसांनी ९१ हजार ८६ रुपयांचा गुटखा जप्त केला आहे.

## संपादकीय »

# आरेवरून कारे, अन् संघर्षाचे वारे...

***राज्यात नव्याने स्थापन झालेल्या शिंदे सरकारच्या मेट्रो कारशेड आरेमध्येच होईल या पहिल्याच निर्णयावर शिवसेना पक्षप्रमुख उद्धव ठाकरे यांनी शुक्रवारी तीव्र शब्दांत नाराजी व्यक्त केली.***

माझी त्यांना हात जोडून विनंती आहे की कृपा करून माझा राग मुंबईवर काढू नका. माझ्या पाठीत सुरा खुपसला, आता मुंबईकरांच्या काळजात कट्यार खुपसू नका. मुंबईच्या पर्यावरणाशी खेळू नका. कांजूरमार्गचा जो प्रस्ताव आम्ही दिला त्यात कुठेही अहंकार नाही. आरेचा आग्रह उगाच रेटू नका असे म्हणत ठाकरेंनी हा निर्णय मागे घेण्याची विनंती शिंदे सरकारला केली, परंतु उपमुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी उद्धव ठाकरेंची ही विनंती स्पष्ट शब्दांत फेटाळून लावत कारशेडचे काम आरेतच होणार हे ठामपणे सांगितले. यासंदर्भात आम्ही उद्धव ठाकरेंचा पूर्ण मान ठेवत योग्य तो निर्णय घेऊ. कारशेड संदर्भात मुंबईकरांचे हित हेच आहे की जिथे कारशेड २५ टक्के तयार झाले तिथेच ते १०० टक्के तयार व्हावे. कारण त्याला सर्वोच्च न्यायालयाची मान्यता आहे, असेही फडणवीस म्हणाले.

उद्धव ठाकरे यांनी मुख्यमंत्रीपदाचा राजीनामा देताना शिवसेना भवन येथे बसणार असल्याचे जाहीर केले होते. त्यानुसार उद्धव ठाकरे हे शुक्रवारी शिवसेना भवन येथे आले आणि त्यांनी शिवसैनिक तसेच पदाधिकाऱ्यांच्या बैठका घेतल्या. त्याचबरोबर पत्रकार परिषद घेत स्थापन झालेल्या नवीन सरकारबाबत आपली भूमिका मांडताना जनतेत निर्माण झालेला संभ्रम दूर केला. उद्धव ठाकरे म्हणाले की, ज्या पद्धतीने सरकार स्थापन झाले आहे आणि त्यांच्या मते शिवसैनिकाला मुख्यमंत्री केले. मग हेच तर मी अडीच वर्षांपूर्वी सांगत होतो. माझ्यात आणि अमित शहा यांच्यात शिवसेना-भाजपने मुख्यमंत्रीपदाचा कार्यकाळ वाटून घेण्याचे ठरले होते. तसे झाले असते तर आज अडीच वर्षे झाली आहेत. जे काही घडले ते शानदारपणे झाले असते. या जोडगोळीने अशाच पद्धतीने अडीच वर्षे पूर्ण केली असती. मग त्यावेळी नकार देऊन आता भाजपने असे का केले, असा सवाल त्यांनी केला.

आरेत पुढे जाण्याचा विचार केला तरी त्यांना जाता येणार नाही. कारण आम्ही मुंबईतील जवळपास ८०० एकरचे जंगल राखीव करून टाकले आहे. कांजूरमार्गची जमीन महाराष्ट्राची आहे. ती महाराष्ट्राच्या, मुंबईच्या हितासाठी वापरा. आरेचा मर्यादित वापर होणार होता. कांजूरला कारशेड गेल्यानंतर मेट्रो बदलापूर-अंबरनाथपर्यंत जाऊ शकेल.



## आनंदी सकाळ

# साधनांत साधन म्हणजे भगवंताचे नाम; दानांत दान म्हणजे अन्नदान

हट्टी आणि व्यसनी माणसे एका दृष्टीने मला आवडतात; कारण त्यांचा हट्ट भगवंताच्या मार्गाला लावला की झाले. परमार्थात नियम थोडाच करावा, पण तो शाश्वताचा असावा; म्हणजे, जेणेकरून भगवंताचे प्रेम लागेल याबद्दलचा असावा आणि तो प्राणाबरोबर सांभाळावा. जे अत्यंत थोर भाग्याचे असतात त्यांनाच ध्यानमार्ग साधतो. हा मार्ग फार थोरांचा आहे. ध्यानामध्ये जगाचाच विसर पडतो; त्या अवस्थेमध्ये दिवस काय पण वर्षेसुद्धा जातील, पण त्याच्या देहाला काही होणार नाही. आपल्यासारख्याला साधनांत साधन म्हणजे भगवंताचे नाम; दानांत दान म्हणजे अन्नदान; आणि उपासनांत उपासना म्हणजे सगुणाची उपासना होय; या तिन्हींमुळे देहाचा विसर पडतो. म्हणून शक्यतो या तीन गोष्टींची कास धरा.मनुष्याची साहजिक प्रवृत्ती व्याप वाढविण्याकडे असते. द्वैत वाढवून त्यात अद्वैत पाहण्यात आनंद असतो हेही खरे.

# जाता पंढरीशी सुख वाटे जीवा... आनंदे केशवा भेटताती



## भूमिका

गौरव जाधव
91 88051 21395

पंढरीची वारी आहे माझे घरी।
आणिक न करी तीर्थव्रत।।
व्रत एकादशी करीन उपवासी।
गाईन अहर्निशी मुखी नाम।।
नाम विठोबाचे घेईन मी वाचे।
बीज कण्यांतीचे तुका म्हणे।।
- संत तुकाराम

आषाढी-कार्तिकी वारी म्हणजे वारकऱ्यांची माहेराच्या वाटेवरची वाटचाल. आनंदाची यात्रा. माहेराला जाताना सासरहून निघालेली लेक जशी आईला भेटायला आतुर असते, तशीच भावावस्था वारकऱ्यांची असते. 'विठ्ठल माझी माय विठ्ठल माझा बाप' असे म्हणत वारकऱ्यांची मांदियाळी पंढरपूरच्या दिशेने अखंडपणे वाटचाल करीत असते.



नाचत, गात, टाळ-मृदंगाचा ध्वनी आसमंतात निनादत, रिंगण, फुगडी, भारुडे आदी विविध आविष्कार करीत भक्तीचा हा प्रवाह वाहत राहतो. या वाटेवर ज्ञानेश्वर-नामदेव गेले. एकनाथ-तुकाराम गेले. चोखामेळा, गोरोबा, सेना, शेख महंमद, निळोबाराय यांची पावले याच मातीत पडली. वारी हे मराठी सांस्कृतिक परंपरेचे वैभव आहे. असा अनुपम सोहळा जगाच्या पाठीवर कुठेही दिसत नाही. 'वारी' हा भक्तीचा सोहळा आहे. आनंदाचा मेळा आहे. यात दोन प्रकारची वाटचाल आहे - एक पंढरपूरच्या दिशेने मुक्काम दरमुक्काम करीत चाललेली पावलांची वाटचाल, तर दुसरी वाटचाल अंतरंगीची आहे. रामकृष्ण हरी, माऊली, सासवडला पोहोचलो. जिकडे-तिकडे पाहतो तर काय नुसते वारकरी... आणि पोलीस बंदोबस्त... हे सगळ पाहून एक गोष्ट तर मला समझली होती की, आज पालखी सासवडला येणार आहे. मनाला खूप आनंद झाला खूप खुश झालो. आज मला वारी पाहायला मिळणार. मला पालखीचे दर्शन घडणार. अहो भाग्यम्...पण थोड्याच वेळात माझ्या या आनंदावर विरझन पडलं... कारण पालखी रात्री येणार होती सासवडला. खूप दुख झालं. खूप वाईट ही वाटलं. यंदा ही ना वारी ना पालखी. माझं कामं आटोपून मी सासवडमधून बाहेर पडलो. तो आनंद सोहळा मला या वेळेस ही अनुभवता नाही आला. मला हे समझलं की, माझी बहीण आणि दाजी आज सासवडला पालखीचे दर्शन घेण्यास जाणार आहेत...मग् आमची चर्चा सुरु झाली. मला सगळे रोड माहिती असल्यामुळे ते मला सासवड कुठून जावं म्हणजे सोपं पडेल हे विचारू लागले... आमची चर्चा अशीच 15 मिनिट चालू राहिली.... बोलताना माझी पण खूप इच्छा होतं होती कि आपण पण जावं... पण कंपनी मध्ये काहीच कळविण्यात आलं न्हवत... आणि अचानक सुट्टी तर कशी मागणार.... पण तरी आता माझी खूपच इच्छा झाली होती... अशी संधी परत येईल का नाही हे माहिती न्हवते... आणि आता मी पण जाण्याच्या निर्णय घेतला... निर्णय घेतला खरा पण त्यासाठी मला कंपनी मधून सुट्टी मिळणे फार गरजेचे होते...

# आता तरी एकमेकांचे पाय ओढणे बंद करा!

**महाराष्ट्रासंदर्भातील अनेक प्रश्नांची उत्तरे देवेंद्र फडणीस, नरेंद्र मोदी आणि अमित शहा यांनी देण्याची गरज आहे. ते तिघेही ती देणार नाहीत, पण जनतेची आकलनशक्ती शाबूत आहे.**

दिल्लीतील भाजप नेत्यांनी महाराष्ट्राच्या भाजपच्या चाणक्यला निर्णयप्रक्रियेपासून संपूर्णपणे दूर ठेवले होते. दूरान्वयानेसुद्धा महाराष्ट्रातील भाजप नेत्यांना सुगावा लागू दिला नाही. हा एकप्रकारे महाराष्ट्राबद्दलचा आकस आहे. देवेंद्र फडणवीस डोईजड होत आहेत असे दिसताच पद्धतशीरपणे त्यांचे पंख कापले. त्याचबरोबर बंडखोर शिवसेना आमदार एकनाथ शिंदे यांना मुख्यमंत्रीपदी बसवून उद्धव ठाकरे आणि शिवसेनेचे खच्चीकरण केले. यापासून महाराष्ट्रातील सर्वच राजकीय पक्षांच्या नेत्यांनी धडा घेऊन एकमेकांचे पाय ओढणे बंद करणे गरजेचे आहे. नाही तर भविष्यातही महाराष्ट्राला दिल्ली दूरच राहील.

महाराष्ट्राचे माजी मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांना केंद्रीय नेतृत्वाने कात्रजचा घाट दाखवून त्यांचा ज्या प्रकारे उपमर्द केला आहे तो प्रकार महाराष्ट्रातीलच काय देशातील कोणालाही रुचलेला नाही. फौजदाराचा हवालदार करून महाराष्ट्रातील तमाम मराठी माणसाला त्याची जागा दाखवण्याचा प्रयत्न तीन व्यापारी वृत्तीच्या नेत्यांनी करून दाखवला. केंद्रीय नेतृत्व कोणत्याही पक्षाचे असो ते नेहमी महाराष्ट्राला दुय्यमच वागणूक देते. सर्व राजकीय पक्षांसहित महाराष्ट्रातील नागरिकांनी उघड त्याचा निषेध केला पाहिजे. भाजपच्या दिल्लीतील धुरीणांनी जपून पावले टाकायचे ठरवलेले दिसतेय. कारण तांत्रिकदृष्ट्या बंडखोर आमदारांची केस संपलेली नाही, तसेच चाळीसपैकी किती गळतील याची शाश्वती नाही. अशा परिस्थितीत 'वेट अँड वॉच' धोरणच योग्य असते. पण काही विपरीत घडू नये म्हणून त्यांना बांधून ठेवणेही आवश्यक होते. यावरून आठवण येते चरणसिंग व चंद्रशेखर यांची. जनता दल फोडण्यासाठी इंदिराजींनी चरणसिंगांना बाहेरून पाठिंबा दिला आणि योग्य वेळी काढून घेतला. तसेच राजीवजींनी चंद्रशेखर यांच्याबाबत केले. दोन्ही वेळा सरकारे पडली. यावेळी मुंबई महापालिकेचे गाजर भाजपला खुणावतेय. वर्षभरात त्या निवडणुका संपेपर्यंत युतीत कुरबुरी चालू झालेल्या असतील. कारण हे राजकारण आहे. त्यामुळे मधुचंद्राचे दिवस जाऊद्यात. अर्थात कणा दाखवणाऱ्याचा कणा मोडण्याचे मशीन भाजपकडे आहे म्हणा.

या सर्व घडामोडींनंतर आज महाराष्ट्रहितासाठी निर्णय घेण्याची अथवा विरोध करण्याचीही क्षमता कुणातच उरलेली नाही. काँग्रेसच्या काळातही प्रादेशिक नेत्यांचे जाणीवपूर्वक खच्चीकरण केले जात असे. महत्त्वाचे निर्णय दिल्लीतच ठरत. परंतु तेव्हा निदान दबावगट तयार करून चर्चा, वाटाघाटी करण्याची तरी सोय होती. नंतर फडणवीसांनीही आपली काहीएक निर्णयक्षमता असल्याचे सिद्ध केले होते. आता तर वरून आदेश आल्यास 'का?' असेही म्हणणे आजच्या मुख्यमंत्र्यांना अथवा उपमुख्यमंत्र्यांना अशक्यप्राय आहे. राजकारणातील सुंदोपसुंदीची धुंदी चढलेले राजकारणी, प्रसार माध्यमे आणि सामान्य जनताही "मराठा तितुका मेळवावा, महाराष्ट्र धर्म वाढवावा" हा मूलमंत्र विसरले. त्यामुळे शेवटी असेच म्हणावे लागेल की, 'महाराष्ट्रास पाडले, मराठी पडले'.

## ।। अभंगवाणी ।।



सुखें वोळंब दावी गोहा ।
माझें दुःख नेणा पाहा ॥१॥
आवडीचा मारिला वेडा ।
होय होय कैसा म्हणे भिडा ॥ध्रु.॥
**- संत तुकाराम**

**महाईन्यूज** हे डिजिटल वृत्तपत्र **संस्थापक संपादक अधिकराव दिवे- पाटील** यांनी विशाल थिएटर, पिंपरीच्या बाजूला **'महाईन्यूज'**च्या पुणे विभागीय कार्यालयामधून प्रकाशित केले आहे. या वृत्तपत्रात डिजिटल स्वरुपात मुद्रीत केलेले लेख, बातम्या तसेच लेखनाशी किंवा विचारांशी संस्थापक संपादक सहमत असतीलच असे नाही. **कार्यकारी संपादक ः *सुनील आढाव.** (*सर्व बातम्यांची, लेखांची व लेखनाची जबाबदारी यांची राहील) एमएसएमई क्रमांक ः MH-26-0158827.
(विशेष सूचना: हा अंक प्रिंटसाठी नाही. गैरवापर केल्यास कायदेशीर कारवाई केली जाईल.)

## शॉर्ट न्यूज

### अपघातात गर्भवतीसह दोन वर्षीय बालकाचा मृत्यू



पडोली-घुग्घुस मार्गावरील खुटाळा गावाजवळील राजस्थान फॅक्ट्रीजवळ भरधार ट्रकने दुचाकीला जबर धडक दिल्याने झालेल्या भीषण अपघातात गर्भवती महिलेसह दोन वर्षीय बालकाचा मृत्यू झाल्याची घटना दुपारी ११.४५ वाजताच्या सुमारास घडली. या अपघातात दोघेजण गंभीर जखमी झाले आहे. नम्रता निखील टावरी (२५), लक्ष टावरी (२) अशी मृतांची नावे आहेत तर निखील टावरी व कनक टावरी, अशी जखमींची नावे आहेत.

खुटाळा गावातील लहूजी नगरातील निखील टावरी हे पत्नी नम्रता, मुलगा लक्ष व कनक या तिघांना घेवून रुग्णालयात जात होते. दरम्यान, राजस्थान फॅक्ट्रीजवळ धरभाव वेगात येणाऱ्या ट्रकने टावरी यांच्या दुचाकीला जबर धडक दिली.

## पाऊले चालती पंढरीची वाट...



**सातारा :** ध्यास एक, आस एक, अट्टहास एक, मैलोन् मैल प्रवास करून पूर्णत्वाचे प्रतीक असणाऱ्या लाडक्या विठूरायाच्या चरणी लीन होण्याकरिता कपाळी केशरी गंध लावून, खांद्यावर भगव्या पताका घेऊन, डोईवर तुळशीवृंदावन घेत मुखाने अखंड ज्ञानोबा-माऊली तुकारामांचा गजर करत गावोगावाहून दिंड्या पंढरपूरकडे प्रस्थान ठेवत आहेत. जावली तालुक्यातून निघालेली ही पायीवारी दिंडी चिमणगावला मुक्कामी असताना ठिकठिकाणी रांगोळ्या काढून भाविक भक्तांचे होणारे स्वागत आणि हरिनामाच्या गजराने अवघे वातावरण भक्तिमय झाले होते. गावागावात दिंड्या आगमनाच्या वेळीच आकाशात ढग दाटून आले होते. सुरुवातीला पावसाच्या हलक्या सरी बरसल्या नंतर वारकरी भक्तांच्या स्वागतासाठीच जणू इंद्रधनुष्याने आगमन केले. यावेळी मात्र भाविकांचा उत्साह द्विगुणीत झाला.

जेव्हा सूर्याची किरणे पावसाच्या थेंबांवर पडतात, तेव्हा किरणांचे विक्षेपण हे इंद्रधनुष्याच्या ७ रंगांचे कारण आहे. पावसाळ्यात ढगांमध्ये असलेल्या पाण्याच्या थेंबांवर प्रकाशकिरण विचलित होतात. विक्षेपणात प्रकाशाच्या किरणांचे परावर्तन आणि अपवर्तन असते. प्रकाशाच्या रंगांची किरणे विक्षेपणाच्या वेळी वाकतात.

प्रकाशाची किरणे दोनदा विचलित होतात. पावसाळ्याच्या दिवसात सप्तरंगी इंद्रधनुष्य तयार होते. चिमणगाव येथील वारकरी भाविकांच्या उत्साहाचे विलोभनीय दृश्य टिपले आहे. **हभप. प्रवीणमहाराज शिंदे-पाटील** यांनी.

### आमच्याकडे १६६ एवढं बहुमत, विरोधी पक्ष अल्पमतात – राम कदम

। मुंबई । महाईन्यूज ।

राज्याचे मुख्यमंत्री एकनाथ शिंदे आणि उपमुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्या नेतृत्वाखाली बैठक पार पडली. उद्या विधीमंडळाचं अधिवेशन असून विधानसभेच्या अध्यक्षपदाची निवड होणार आहे. भाजप नेते राहुल नार्वेकर यांनी अर्ज भरला आहे. त्यांची अध्यक्षपदाची बैठक व्यवस्थितपणे पार पडेल आणि आम्हीच ही निवडणूक जिंकू. आमच्याकडे १६६ एवढं बहुमत आहे आणि विरोधी पक्ष अल्पमतात आहेत.

त्यामुळे आमच्याच उमेदवाराचा विजय होईल, असं भाजपचे आमदार राम कदम म्हणाले. शिंदे-भाजपची संयुक्ति बैठक पार पडल्यानंतर राम कदम यांनी प्रसार माध्यमांशी संवाद साधला. त्यावेळी ते म्हणाले की, कामकाजामध्ये पहिलं कामकाज हे अध्यक्षपदाच्या निवडणुकीचं कामकाज आहे. जेव्हा अध्यक्षपदाची निवड पार पडते आणि आमदार जिंकतात. यावेळी राहुल नार्वेकर यांचं नाव आहे. ते जिंकल्यानंतर दुसरा प्रस्ताव येण्याचा प्रश्नच येत नाही.

# ११ दिवसानंतर बंडखोर आमदार मुंबईत दाखल

## भाजपासह शिंदे गटाची ताज प्रेसिडेंटमध्ये संयुक्त बैठक

। मुंबई । महाईन्यूज ।



विधान परिषदेच्या निवडणुकीनंतर शिवसेनेचे ज्येष्ठ नेते एकनाथ शिंदे यांनी बंडखोरी केली होती. ते आपल्यासोबत जवळपास ३० हून अधिक आमदार घेऊन गुजरातमधील सुरत याठिकाणी गेले होते. त्यानंतर ते सर्व आमदारांना घेऊन आसाममधील गुवाहाटी याठिकाणी गेले होते. तेथून सर्व आमदार गोव्यात गेले होते. तब्बल अकरा दिवसांच्या प्रवासानंतर हे सर्व आमदार अखेर मुंबईत दाखल झाले आहेत. एकनाथ शिंदेसह ३९ बंडखोर आमदार काही वेळापूर्वी मुंबई विमानतळावर दाखल झाले आहेत. मुंबईत दाखल होताच मुंबईतील ताज प्रेसिडेंट हॉटेलमध्ये भारतीय जनता पार्टी आणि शिंदे गटाची संयुक्त बैठक पार पडत आहेत. या बैठकीला एकनाथ शिंदेसह सर्व बंडखोर आमदार उपस्थित आहेत. सरकार स्थापन झाल्यानंतर भाजपा आणि शिंदे गटाची ही पहिलीच बैठक आहे. उद्या विधानसभा अध्यक्ष पदाची निवडणूक असल्याने हे सर्व आमदार मुंबईत दाखल झाले आहेत. या बैठकीत अध्यक्ष पदाच्या निवडणुकीबाबत रणनीती ठरवली जाणार आहे. ज्या हॉटेलमध्ये ही बैठक सुरू आहे, येथे मोठ्या प्रमाणात सुरक्षा व्यवस्था वाढवण्यात आली आहे. हॉटेलमध्ये केवळ आमदारांनाच प्रवेश देण्यात येत आहे. आमदारांची सुरक्षाव्यवस्था आणि पीए यांना देखील बाहेर थांबवण्यात येत आहे. संबंधित बैठकीत नेमके कोणते निर्णय होतात? याकडे सर्वांचं लक्ष लागलं असून अध्यक्षपदाची निवडणूक ही भाजपा आणि शिंदे गटाची पहिली परीक्षा ठरणार आहे.

खरंतर, विधानसभा अध्यक्षपदाच्या निवडणुकीसाठी भारतीय जनता पार्टी आणि महाविकास आघाडीने आपल्या उमेदवारांची नावे घोषित केली आहेत. भाजपाकडून राहुल नार्वेकर तर महाविकास आघाडीकडून शिवसेनेचे आमदार राजन साळवी यांना उमेदवारी देण्यात आली आहे. त्यामुळे आता विधानसभा अध्यक्षपदाची निवडणूक विधान परिषद आणि राज्यसभेप्रमाणे चुरशीची ठरणार आहे. उद्या ३ जुलै रोजी ही निवडणूक पार पडणार आहे. मुंबई पोलीस उपायुक्त विश्वास नांगरे पाटील यांनी यावेळी सुरक्षा व्यवस्थेची पाहणी केली आणि पोलिसांना योग्य त्या सूचना दिल्या आहेत. गोव्यातून बंडखोर आमदार मुंबईत दाखल झाल्यानंतर मुंबई पोलीस सतर्क असून सर्व खबरदारीच्या उपाययोजना करण्यात आल्या आहेत. मुंबई वाहतूक पोलीस गिरगांव चौपाटीजवळ रस्त्यावर कोणतेही वाहन उभे करून दिलेलं नाही.

### अध्यक्ष पदाच्या निवडणुकीबाबत रणनीती

मुंबईत दाखल होताच मुंबईतील ताज प्रेसिडेंट हॉटेलमध्ये भारतीय जनता पार्टी आणि शिंदे गटाची संयुक्त बैठक पार पडत आहेत. या बैठकीला एकनाथ शिंदेसह सर्व बंडखोर आमदार उपस्थित आहेत. सरकार स्थापन झाल्यानंतर भाजपा आणि शिंदे गटाची ही पहिलीच बैठक आहे. उद्या विधानसभा अध्यक्ष पदाची निवडणूक असल्याने हे सर्व आमदार मुंबईत दाखल झाले आहेत. या बैठकीत अध्यक्ष पदाच्या निवडणुकीबाबत रणनीती ठरवली जाणार आहे.

### जागोजागी रस्त्यावर पोलीस बंदोबस्त तैनात

विमानतळावरून जवळपास १ तासाचं हे अंतर आहे. परंतु यादरम्यानचा संपूर्ण रस्ता मोकळा करण्यात आला असून हे अंतर कमी वेळेत कापण्यास त्यांना मदत होणार आहे. या बंडखोर आमदारांच्या सुरक्षेसाठी मुंबई पोलिसांचे सर्व कर्मचारी गस्त आणि राऊंडअपवर होते. त्यासाठी मुंबईत एअरपोर्ट ते ओबेरॉय हॉटेलपर्यंत जागोजागी रस्त्यावर पोलीस बंदोबस्त तैनात करण्यात होता.

## शॉर्ट न्यूज »

### आसाममधील पूरस्थिती पुन्हा गंभीर

।गुवाहाटी। महाईन्यूज ।प्रतिनिधी।

आसाममधील पूरस्थिती शुक्रवारी पुन्हा गंभीर झाली. गेल्या २४ तासांत २९ लाखांपेक्षा जास्त नागरिकांना पुराचा फटका बसला आहे. कच्छर जिल्ह्याचे मुख्यालय असलेल्या सिलचरचा बहुतांश भाग पुराने बाधित झाला आहे. आसाम राज्य पूर व्यवस्थापन प्राधिकरणाने दिलेल्या माहितीनुसार पुरामुळे मृत्युमुखी पडलेल्यांची एकूण संख्या १५९ वर पोहोचली आहे. ३६ जण बेपत्ता आहेत. केंद्रीय गृहमंत्रालयातर्फे एक आंतर-मंत्रालयीन पथक आसाममध्ये पोहोचले असून, दोन दिवस ते पूरग्रस्त भागाची पाहणी करणार आहे. आसामचे मुख्यमंत्री हिमंता बिस्वा सरमा यांनी गेल्या दहा दिवसांत तिसऱ्यांदा बराक खोऱ्याला भेट दिली. करीमगंज जिल्ह्यातील पूरस्थितीचा आढावा त्यांनी घेतला. सुभाष हायस्कूल कालीबारी आणि गोपिकानगर येथील मदत शिबिरांना त्यांनी भेट दिली. मुख्यमंत्र्यांनी यापूर्वी दोनदा सिलचरला भेट देऊन पाण्याखाली गेलेल्या शहराचे हवाई सर्वेक्षण केले होते. मेहेरपूर, विवेकानंद रोड, दास कॉलनी, अंबिकापट्टी, चर्च रोड, चंडीचरण रोड, बिलपार, पब्लिक स्कूल रोड, सुभाष नगर आणि एनएस अव्हेन्यूसह सिलचरमधील अनेक भागांत पूर आला आहे. उपायुक्त कीर्ती जल्ली यांनी सांगितले, की बेथुकुंडी येथील फुटलेल्या बंधाऱ्याच्या दुरुस्तीचे काम सुरू आहे.

हैदराबादमध्ये दोन दिवसीय कार्यकारणी बैठकीचे आयोजन

# भाजपाचे 'मिशन दक्षिण'!

## भाजपाकडून हैदराबादमध्ये मोठ्या प्रमाणात शक्ती प्रदर्शन

।मुंबई ।महाईन्यूज ।

हैदराबादमध्ये भाजपाच्या दोन दिवसीय कार्यकारणी बैठकीचे आयोजन करण्यात आले आहे. २ आणि ३ जुलैला आयोजित करण्यात आलेल्या या बैठकीत पंतप्रधान नरेंद्र मोदींसह भाजपाचे वरिष्ठ नेते सहभागी होणार आहेत. १८ भाजपशासित राज्यांचे मुख्यमंत्रीही या बैठकीत सहभागी होणर आहेत. बैठकीच्या पार्श्वभूमीवर भाजपाकडून हैदराबादमध्ये मोठ्या प्रमाणात शक्ती प्रदर्शन करण्यात येत आहे. अनेक ठिकाणी मोठमोठे बॅनर लावण्यात आले आहेत. हैदराबादमध्ये भाजपाच्या दोन दिवसीय कार्यकारणी बैठकीचे आयोजन करण्यात आले आहे. या बैठकीत पंतप्रधान नरेंद्र मोदींसह भाजपाचे वरिष्ठ नेते सहभागी होणार आहेत. १८ भाजपशासित राज्यांचे मुख्यमंत्रीही या बैठकीत सहभागी होणर आहेत. बैठकीच्या पार्श्वभूमीवर भाजपाकडून हैदराबादमध्ये मोठ्या प्रमाणात शक्ती प्रदर्शन करण्यात येत आहे. अनेक ठिकाणी मोठमोठे बॅनर लावण्यात आले आहेत. या बैठकीत पक्षाचा विस्तार तसेच २०२४ च्या लोकसभा निवडणुकीबाबत धोरण ठरण्यात येणार आहे. या बैठकीत ओडिशाचे भाजपा अध्यक्ष समीर मोहंती, पर्यटन राज्यमंत्री श्रीपाद नाईक, भाजपचे राष्ट्रीय प्रवक्ते के के शर्मा, तामिळनाडू भाजपा अध्यक्ष अन्नामलाई, गुजरातचे उप मुख्यमंत्री नितीन पटेल सहभागी होणार आहेत. हैदराबादमध्ये भाजपच्या राष्ट्रीय कार्यकारिणीच्या पहिल्या दिवसाची सुरुवात सरचिटणीसांच्या बैठकीने होणार आहे. ज्या बैठकीला पंतप्रधान नरेंद्र मोदी आणि सर्व ज्येष्ठ नेते उपस्थित राहणार आहेत.



### भाजपाचे 'मिशन दक्षिण'

जवळजवळ १८ वर्षांनंतर, हैदराबादमध्ये भाजपाच्या राष्ट्रीय कार्यकारिणीची बैठक होत आहे. या अगोदर २००४ साली हैदराबादमध्ये भाजपाच्या राष्ट्रीय कार्यकारिणीची बैठक झाली होती. ही बैठक तेलंगणासाठी महत्वाची असल्याचे सांगितले जात आहे. पुढच्या वर्षी तेलंगणा विधानसभेच्या निवडणुका होणार आहेत. या निवडणुकांसाठी भाजपाने आपली कंबर कसली आहे. 'मिशन दक्षिण' अजेंड्याखाली भाजपा दक्षिण भागातील अधिकाधिक मतदारांना आपल्या बाजूने वळवण्याचा प्रयत्न करणार आहे.

# सर्वोच्च न्यायालयाच्या ताशेऱ्यांनंतर केंद्र सरकार विरोधकांकडून लक्ष्य

## द्वेष पसरवण्यास एनडीए सरकार कारणीभूत

।नवी दिल्ली। महाईन्यूज । वृत्तसंस्था ।



प्रेषित मोहम्मद यांच्याबाबत वादग्रस्त वक्तव्य केल्याबद्दल निलंबित भाजप नेत्या नूपुर शर्मा यांच्यावर सर्वोच्च न्यायालयाने शुक्रवारी ताशेरे ओढल्यानंतर विरोधकांनीही केंद्र सरकारला टीकेचे लक्ष्य केले. देशात द्वेषाचे वातावरण भडकावण्यास सत्ताधारी राष्ट्रीय लोकशाही आघाडी (एनडीए) जबाबदार असल्याची टीका विरोधकांनी केली आहे.

गेल्या आठवडय़ात स्टुडंट्स फेडरेशन ऑफ इंडियाच्या (एसएफआय) कार्यकर्त्यांनी कलपेट्टा (केरळ) येथे काँग्रेस नेते राहुल गांधींच्या कार्यालयाची तोडफोड केली होती. त्याची पाहणी केल्यानंतर राहुल म्हणाले, की सत्ताधारी पक्ष भाजपची मान शरमेने झुकली पाहिजे, केंद्रातील 'एनडीए' सरकारने ही परिस्थिती निर्माण केल्याचा आरोप काँग्रेस नेते राहुल गांधी यांनी केला. हे द्वेषमूलक वातावरण पंतप्रधान, गृहमंत्री, भाजप आणि राष्ट्रीय स्वयंसेवक संघाने निर्माण केले. देशात निर्माण केलेले हे वातावरण देशविरोधी कारवायाच आहेत. हे देशाच्या हिताविरुद्ध आहे, असेही त्यांनी नमूद केले.

काँग्रेसचे सरचिटणीस जयराम रमेश यांनी एका निवेदनात म्हटले आहे की, सर्वोच्च न्यायालयाच्या टिप्पणीमुळे फूट पाडणाऱ्या विचारसरणीविरुद्ध लढण्याचा काँग्रेसचा संकल्प अधिक बळकट झाला आहे. सर्वोच्च न्यायालयाने महत्त्वपूर्ण आणि दूरगामी निरीक्षणे नोंदवली आहेत. देशातील भावना भडकावण्यास भाजपच्या प्रवक्त्या एकटय़ा जबाबदार असून, त्यांनी संपूर्ण देशाची माफी मागण्याचे न्यायालयाचे निर्देश योग्यच आहेत.भारतीय कम्युनिस्ट पक्षाचे सरचिटणीस सीताराम येचुरी यांनी 'ट्विट'मध्ये म्हटले, की, नूपुर शर्मा यांच्यावर कायदेशीर कारवाई केली जाईल, अशी आशा आम्हाला वाटते. पण शर्मा आणि त्यांच्यासारख्यांवर कायद्याच्या कक्षेत राहून कारवाई केली नाही, तर चुकीचा संदेश जाईल. राष्ट्रीय स्वयंसेवक संघ व भाजपच्या द्वेषनिर्मितीतून व वाहिन्यांवरील कडवट वादविवादातून हे फोफावत असल्याचे आढळेल.

# उपमुख्यमंत्री पदावर फडणवीस समाधानी!

## राज्यातील सत्तांतरनाटय़ात सहभागी भाजप नेत्याचा दावा

।हैदराबाद ।महाईन्यूज । वृत्तसंस्था ।




राज्यात नवनियुक्त एकनाथ शिंदे यांच्या सरकारमध्ये भाजपचे ज्येष्ठ नेते देवेंद्र फडणवीस यांना उपमुख्यमंत्री केल्यानंतर, केंद्रीय नेतृत्वाच्या या निर्णयामुळे प्रदेश भाजपच्या नेत्यांनाही धक्का बसला. त्यावर, "फडणवीस हे भाजपचे खंदे कार्यकर्ता आहेत, ते पक्षाच्या आदेशाचे पालन करत आहेत आणि त्यांना दिलेल्या जबाबदारीबद्दल ते खूश आहेत," असा दावा भाजपच्या ज्येष्ठ नेत्याने केला.भाजपचे राष्ट्रीय कार्यकारिणीतील सदस्य आणि ज्येष्ठ नेते राज्यातील सत्तांतराच्या घडामोडींमध्ये प्रत्यक्ष सहभागी होते. सिकंदराबादमध्ये भाजपच्या राष्ट्रीय कार्यकारिणीची तीन दिवसांची बैठक शुक्रवारी सुरू झाली. या बैठकीमध्ये सामील होण्यासाठी भाजपचे हे नेते सिकंदराबादमध्ये दाखल झाले आहेत. महाराष्ट्रातील शिंदे यांच्या सरकारला बहुमत सिद्ध करावे लागणार असून त्यासाठी विधानसभेचे विशेष अधिवेशन बोलावण्यात आले आहे. त्यामुळे फडणवीस भाजपच्या राष्ट्रीय कार्यकारिणीच्या बैठकांना उपस्थित राहण्याची शक्यता नाही. मात्र, अधिकृतपणे भाजपने प्रतिक्रिया देण्यास नकार दिला आहे.उद्धव ठाकरे यांनी मुख्यमंत्री पदाचा राजीनामा दिल्यानंतर महाराष्ट्र भाजपने फडणवीस यांचे जुने भाषण ट्वीट केले. "मी परत येईन.. नवमहाराष्ट्राच्या निर्मितीसाठी!" ही ध्वनिचित्रफीत अजूनही महाराष्ट्र भाजपच्या ट्विटर खात्यावर ठेवण्यात आली आहे. यासंदर्भात विचारलेल्या प्रश्नावर भाजपचे नेते म्हणाले की, शिंदेंना मुख्यमंत्री करण्याचा भाजपचा निर्णय योग्य आहे.

### दोन दिवस मोदींची उपस्थिती

पंतप्रधान नरेंद्र मोदी शनिवार आणि रविवार अशा दोन्ही दिवशी कार्यकारिणीच्या प्रत्येक सत्रातील बैठकांना उपस्थित राहणार आहेत. रविवारी कार्यसमितीची बैठक झाल्यानंतर ३४० निमंत्रित पदाधिकाऱ्यांशी मोदी संवाद साधतील. त्यानंतर सिकंदराबादमधील परेड मैदानावर मोदींची जाहीर सभा होणार आहे. या सभेपासून भाजपचा तेलंगणामध्ये 'विजयसंकल्प' सुरू होईल. २०२३च्या अखेरीस तेलंगणामध्ये विधानसभेची निवडणूक होणार असून तेलंगण राष्ट्र समितीचे आता अखेरचे दिवस सुरू झाले आहेत, असे तेलंगणाचे प्रभारी तरुण चुग म्हणाले. तेलंगणामध्ये भाजपच्या प्रत्येक कार्यालयाबाहेर घडय़ाळ लावले असून मुख्यमंत्री चंद्रशेखर राव यांचे 'काऊंट डाऊन' सुरू झाले आहे. भाजपने 'बाय बाय केसीआर'चा नारा दिला आहे.

# जय भानुशालीच्या पत्नीला आणि मुलीला कुकने दिली जीवे मारण्याची धमकी



गुरूवारी जय भानुशाली आणि माही विजने पोलिस स्टेशनमध्ये जाऊन कुकविरोधात तक्रार दाखल केली. कुकने जय आणि माहीसोबतच त्यांच्या २ वर्षीय लहान मुलीला देखील जीवेमारण्याची धमकी दिली आहे

हिंदी टेलिव्हिजनवरील अभिनेता जय भानुशाली आणि अभिनेत्री माही विज दोघेही सोशल मीडियावर खूप सक्रिय असते. वारंवार ते आपल्या सोशल मीडियावर एकमेकांसोबतचे आणि मुलीबरोबरचे अनेक फोटो आणि व्हिडीओ शेअर करत असतात. दरम्यान माहीने खुलासा केला आहे की, त्यांच्या घरातील कुकने तिला जेवे मारण्याची धमकी दिली आहे. कुकच्या या धमकीनंतर जय आणि माहीने पोलिस स्टेशनमध्ये कुकविरोधात तक्रार दाखल केला आहे. माही विजला कुकची धमकी गुरूवारी जय भानुशाली आणि माही विजने पोलिस स्टेशनमध्ये जाऊन कुकविरोधात तक्रार दाखल केली.

कुकने जय आणि माहीसोबतच त्यांच्या २ वर्षीय लहान मुलीला देखील जीवेमारण्याची धमकी दिली. माही यासंबंधीत सोशल मीडियावर अनेक ट्वीट देखील केले होते. ज्याला माही नंतर डिलीट देखील केलं. त्यानंतर माहीने एका मुलाखतीत याबाबत संपूर्ण खुलासा केला.

# प्रियंका चोप्राचा अमेरिकेत नवा व्यवसाय



अभिनेत्री प्रियंका चोप्रा हिने अमेरिकेमध्ये स्वतः चा एक नवीन व्यवसाय सुरु केला आहे आणि प्रियंकाच्या या नव्या व्यवसायाची आणि तिथल्या वस्तूंच्या किमतीची सध्या सोशल मीडियावर मोठ्या प्रमाणात चर्चा सुरु आहे.

प्रसिद्ध अभिनेत्री प्रियंका चोप्राने बॉलिवूड प्रमाणेच हॉलिवूड मध्येही आपल्या अभिनयाने विशेष ओळख निर्माण केली आहे. प्रियंकाने आजवर अनेक चित्रपटांमधून विविध भूमिका साकारल्या आहेत. त्याच सोबत प्रियंका चोप्रा सोशल मीडियावर सक्रिय असते. अभिनेत्री प्रियंका चोप्रा हिने अमेरिकेमध्ये स्वतः चा एक नवीन व्यवसाय सुरु केला आहे आणि प्रियंकाच्या या नव्या व्यवसायाची आणि तिथल्या वस्तूंच्या किमतीची सध्या सोशल मीडियावर मोठ्या प्रमाणात चर्चा सुरु आहे. चर्चेत असते. सोशल मीडियावर ती सतत तिचे फोटो आणि व्हिडिओ पोस्ट करत असते. प्रियंका चोप्राने 'सोना होम' या नावाने होमवेयर कलेक्शन लॉंच केले आहे. प्रियंकाने तिचे हे कलेक्शन २२ जून २०२२ रोजी लॉंच केले. मनीष गोयल हा या व्यवसायामध्ये प्रियंकाचा पार्टनर आहे. प्रियंकाने तीचा हा नवा व्यवसाय अमेरिकेमध्ये सुरु केला असून या व्यवसायामुळे प्रियंका सोशल मीडियावर चर्चेत आली आहे. न्यूयॉर्क यामध्ये प्रियंकाचे 'सोना' हॉटेल देखील आहे. त्याचबरोबर 'सोना होम' या प्रियंकाच्या कंपनीमध्ये होमवेयर वस्तू उपलब्ध आहेत. पण त्या सगळ्या वस्तूंची किंमत खूप जास्त आहे.

# मृण्मयी आणि गौतमीचा नवा फिटनेस फंडा

मराठी चित्रपट सृष्टीमधील लोकप्रिय बहिणींची जोडी म्हणजे अभिनेत्री मृण्मयी देशपांडे आणि अभिनेत्री गौतमी देशपांडे या दोघीही बहिणी उत्तम अभिनेत्री आहेत. गौतमी आणि मृण्मयी या दोघी बहिणी सोशल मीडियावर खूप सक्रिय असतात. या दोन बहिणींची धमाल आणि मजा – मस्ती नेहमीच त्यांच्या चाहत्यांना पाहायला मिळत असते. त्यांचे व्हिडीओ सुद्धा सोशल मीडियावर खूप पहिले जातात. नुकताच मृण्मयीने गौतमीसोबतचा एक व्हिडीओ सोशल मीडियावर पोस्ट केला आहे. या व्हिडीओ मध्ये दोघी बहिणी व्यायाम करताना दिसत आहेत. व्यायाम करत असलेला हा व्हिडीओ पाहून नेटकऱ्यांना मात्र गौतमीची दया आली आहे. या व्हिडीओ वर नेटकऱ्यांच्या प्रतिक्रिया येत आहेत. गौतमी देशपांडे आणि मृण्मयी देशपांडे या दोन्ही बहिणी सोशल मीडियावर स्वतःचे व्हिडीओ आणि फोटो शेअर करत असतात. त्यांचे हे भन्नाट व्हिडीओ पाहून नेटकऱ्यांसोबतच सिने सृष्टीमधील अनेक कलाकार सुद्धा प्रतिक्रिया देत असतात. या बहिणींचे व्हिडीओ आणि त्यांची धमाल सुद्धा सोशल मीडियावर चर्चेत असतात. नुकताच अभिनेत्री आणि नृत्यांगना मृण्मयी देशपांडे हीने तिच्या इंस्टाग्राम अकाऊंटवरून एक व्हिडीओ शेअर केला होता.




# धर्मवीर मधील फोटो शेअर करत प्रसाद ओकने दिल्या एकनाथ शिंदेंना शुभेच्छा



राज्यात गेल्या काही दिवसांपासून सुरू असलेल्या राजकीय संघर्षानंतर अखेर काल शिवसेना नेते एकनाथ शिंदे हे महाराष्ट्राचे नवे मुख्यमंत्री असतील अशी घोषणा देवेंद्र फडणवीस यांच्याकडून करण्यात आली, तसेच देवेंद्र फडणवीस हे उपमुख्यमंत्री झाले. काल संध्याकाळी ७:३० च्या सुमारास राजभवनामध्ये मुख्यमंत्री एकनाथ शिंदे आणि उपमुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी आपल्या मंत्री पदाची शपथ घेतली. एकनाथ शिंदेंच्या दहा दिवसाच्या बंडाचे फळ त्यांना मिळाला.

एकनाथ शिंदे यांनी मुख्यमंत्री पदाची शपथ घेतल्यानंतर आता सामाजिक , राजकीय, सामान्य जनता तसेच मनोरंजन सृष्टीतील कलाकारांकडूनही एकनाथ शिंदेंना अनेक शुभेच्छा दिल्या जात आहेत. नुकतीच एक पोस्ट सोशल मीडियावर शेअर करत अभिनेता आणि दिग्दर्शक प्रसाद ओक याने एकनाथ शिंदेंना शुभेच्छा दिल्या आहेत.

# आयर्नमॅन मिलिंद सोमणच्या 'या' वर्कआऊट टिप्स फॉलो करत रहा फिट



भारतच सुपर मॉडेल आणि ५६ वर्षीय मराठमोळा अभिनेता मिलिंद सोमण आपल्या जबरदस्त बॉडी आणि फिटनेससाठी प्रसिद्ध आहे. त्याने आजवर आयर्नमॅन आणि अल्ट्रामॅनसारख्या स्पर्धा जिंकल्या आहेत. मिलिंद हा एक फिटनेस फ्रीक मॉडेल म्हणून ओळखला जातो. ज्याचे इन्स्टाग्राम वर्कआऊट्स आणि योगा सेशनच्या फोटोंनी भरलेले आहे. 56 व्या वर्षीही मिलिंद शहराच्या गजबजाटापासून दूर निसर्गाच्या सानिध्यात कधी सायकल चालवताना, कधी पुश-अप करताना तर कधी पुल अप करताना दिसतो. मिलिंदच्या मते, प्रत्येकाने आपल्या वयाप्रमाणे आरोग्याबाबत सतर्क असणे आवश्यक आहे, कारण वय वाढत तसे आपले स्नायू देखील कमकुवत होतात.

## शॉर्ट न्यूज »

### भारतात वेगवान गोलंदाज कर्णधार बनणे दुर्मीळ का?



नवी दिल्ली । महाईन्यूज


सध्या इंग्लंडविरुद्ध सुरू असलेल्या प्रलंबित पाचव्या कसोटी सामन्यासाठी वेगवान गोलंदाज जसप्रीत बुमराकडे भारताचे कर्णधारपद सोपवण्यात आले. बुमरा हा भारताचा ३६वा कसोटी कर्णधार असला तरी कपिल देव यांच्यानंतरचा फक्त दुसराच वेगवान गोलंदाज आहे. रोहित शर्माला करोनाची लागण झाल्यामुळे आणि केएल राहुलच्या दुखापतीवर शस्त्रक्रिया झाल्यामुळे बुमराकडे कर्णधारपद सोपवण्यात आले आहे. परंतु तरीही भारताच्या कसोटी कर्णधारपदावर फलंदाजांचेच वर्चस्व आढळते. कोर्टनी वॉल्श, वसिम अक्रम, वकार युनुस, मश्रफे मोर्तझा, बॉब विलिस, हीथ स्ट्रीक, डॅरेन सामी, जेसन होल्डर, पॅट कमिन्स, जसप्रीत बुमरा या निव्वळ वेगवान गोलंदाजांसह कपिलदेव, शॉन पोलॉक, इम्रान खान, इयान बोथम या अष्टपैलू वेगवान गोलंदाजांनी जागतिक क्रिकेटमध्ये कर्णधारपद सांभाळले आहे.

# स्टुअर्ट ब्रॉडने घेतली कुंबळे आणि वॉर्नच्या क्लबमध्ये एंट्री!

## कामगिरी करणारा इंग्लंडचा दुसराच गोलंदाज

।नवी दिल्ली । महाईन्यूज ।

भारत आणि इंग्लंड यांच्यादरम्यान सुरू असलेल्या एजबस्टन कसोटी सामन्यातील दुसरा दिवस स्टुअर्ट ब्रॉडसाठी संस्मरणीय ठरला. एकाच दिवशी आणि अवघ्या काही मिनिटांच्या फरकाने त्याने दोन चांगले-वाईट विक्रम आपल्या नावे केले. भारतीय कर्णधार जसप्रीत बुमराहने ब्रॉडच्या एकाच षटकामध्ये ३५ धावा फटकावून कसोटी क्रिकेटमधील जागतिक विक्रम केला. परिणामी, कसोटी क्रिकेटमध्ये एका षटकात सर्वात जास्त धावा देण्याचा विक्रम ब्रॉडच्या नावे नोंदवला गेला. मात्र, असे असले तरी त्याने आज आणखी एक कामगिरी केली आहे. स्टुअर्ट ब्रॉडने आंतरराष्ट्रीय कसोटी कारकिर्दीत ५५० बळींचा टप्पा गाठला.



मोहम्मद शामी हा ब्रॉडचा ५५०वा बळी ठरला. कसोटी क्रिकेटमध्ये ५५० बळी घेणारा तो जगातील सहावा आणि इंग्लंडचा दुसरा गोलंदाज ठरला आहे. ब्रॉडच्या अगोदर जेम्स अँडरसनने अशी कामगिरी केलेली आहे. अँडरसनने कसोटीमध्ये ६५६ बळी मिळवलेले आहेत. ब्रॉडच्या पूर्वी मुथैया मुरलीधरन (श्रीलंका-८००), शेन वॉर्न (ऑस्ट्रेलिया-७०८), जेम्स एंडरसन (इंग्लंड-६५७), अनिल कुंबले (भारत-६१९) आणि ग्लेन मैकग्राथ (ऑस्ट्रेलिया-५६३) या खेळाडूंनी ५०० कसोटी बळींचा टप्पा ओलांडलेला आहे. स्टुअर्ट ब्रॉड हा कसोटी क्रिकेटमध्ये एक नव्हे तर दोन हॅट्रिक घेण्याचा विक्रम करणाऱ्या मोजक्या गोलंदाजांपैकी एक आहे. २०११ मध्ये त्याने भारताविरुद्धच्या नॉटिंगहॅम कसोटीत पहिली हॅट्रिक मिळवली होती. त्यावेळी त्याने एमएस धोनी, हरभजन सिंग आणि प्रवीण कुमार यांना बाद केले होते. तर, त्याची दुसरी हॅटट्रिक श्रीलंकेविरुद्ध घेतली होती. त्याने कुमार संगकारा, दिनेश चंडिमल आणि शमिंदा एरंगा यांना बाद केले होते.

याशिवाय, स्टुअर्ट ब्रॉड हा कसोटी क्रिकेटमध्ये ५५० बळी आणि शतक करणारा जगातील एकमेव खेळाडू आहे. २०१० मध्ये त्याने लॉर्ड्सच्या ऐतिहासिक मैदानावर पाकिस्तानविरुद्धच्या सामन्याच्या २९७ चेंडूंचा सामना करून १६९ धावांची ऐतिहासिक खेळी केली होती.

# चेतेश्वर पुजाराच्या नावे झाली 'नको त्या' विक्रमाची नोंद

## फलंदाजांच्या यादीत पुजारा अव्वल स्थानावर

। नवी दिल्ली । महाईन्यूज ।



गेल्या वर्षी अर्धवट राहिलेली पाच सामन्यांची कसोटी मालिका पूर्ण करण्यासाठी भारतीय संघ इंग्लंड दौऱ्यावर गेला आहे. या दौऱ्यापूर्वी चेतेश्वर पुजाराने ससेक्स कौंटीसाठी चांगली कामगिरी केली होती. पुजाराने पाच सामन्यांत ७००हून अधिक धावा केल्या होत्या. याच कारणामुळे त्याचा इंग्लंडविरुद्धच्या एजसबस्टन कसोटीसाठी संघात समावेश करण्यात आला. मात्र, या कसोटी सामन्याच्या पहिल्या डावात पुजारा चांगली कामगिरी करू शकला नाही. जेम्स अँडरसनने त्याला अवघ्या १३ धावांवर माघारी धाडले. पुजारा बाद होताच त्याच्या नावावर एका विचित्र विक्रमाची नोंद झाली. कसोटी क्रिकेटमध्ये चेतेश्वर पुजारा १२व्या वेळी अँडरसनकडून बाद झाला.

जेम्स अँडरसनला इंग्लंडच्या कसोटी क्रिकेटमधील सर्वात महत्त्वाचा गोलंदाज मानले जाते. वेळोवेळी त्याने आपले महत्त्व सिद्धही केले आहे. सध्या सुरू असलेल्या भारताविरुद्धच्या कसोटी सामन्यातील पहिल्या दिवशी त्याने अँडरसनने चांगली कामगिरी करत तीन भारतीय फलंदाजांना बाद केले. चेतेश्वर पुजारा हा या सामन्यातील त्याचा दुसरा बळी ठरला. अँडरसनने कसोटी क्रिकेटमध्ये सर्वाधिक वेळा बाद केलेल्या फलंदाजांच्या यादीत पुजारा अव्वल स्थानावर गेला आहे. अँडरसनने पुजाराला १२ वेळा बाद केले. यापूर्वी त्याने ऑस्ट्रेलियन वेगवान गोलंदाज पीटर सीडलला ११ वेळा बाद केले होते. याशिवाय त्याने ऑस्ट्रेलियाचा सलामीवीर डेव्हिड वॉर्नरला १० वेळा, सचिन तेंडुलकर, मायकेल क्लार्क आणि अझहर अली यांना प्रत्येकी नऊ वेळा बाद केले आहे

महाईन्यूज
जाहिरात आणि बातम्यांसाठी संपर्क
708 309 8763

महाईन्यूज नोंद असूद्या..
महाईन्यूजची डिजीटल आवृत्ती छपाईसाठी नाही